"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 06, Issue: 06, Nov. – Dec. 2019 eISSN NO. 2394-5362
Impact Factor (SJIF) – 5.266

# दलित महिलांचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तन

**अशोक दशरथ सातपुते**
**सहाय्यक प्राध्यापक**
**कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा**

भारतीय समाज व्यवस्थेत अनादी काळापासुन अनुसूचीत जातीकडे विशेषता स्त्रीयांकडे फारसे लक्ष दिलेले नाही. १९८१ च्या शिरगणतीनुसार भारतीय लोकसंख्येच्या २३.५ टक्के लोकसंख्या ही मागासवर्गीय लोकांची आहे. त्यापैकी अनु. जातीतील लोकसंख्या १५.८ टक्के आहे. एवढया मोठया संख्येने असुनही अनादी काळापासून इतर समुहापेक्षा या समुहातील लोकांना कमी फायदे मिळाले आहेत. स्त्रीयांच्या बाबतीत गुलामाची अवस्था होती. दलित महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. भारतीय राज्य घटनेनुसार अनु. जातींना विशेषता महिलांना विशेष संरक्षण देण्यात आले. त्यामुळे काही प्रमाणात परिस्थितीत सुधारणा झाली. १९६१ साली अनु. जातीच्या निरक्षरतेचे प्रमाण ९० टक्के होते. १९८१साली अनु. जातीच्या महिलांचे साक्षरतेचे प्रमाण १०.९ टक्के होते. पंचवार्षिक योजनांमध्ये दुर्बल घटकांच्या विकासाठी व शिक्षणासाठी तरतूदी करण्यात आली व त्यासाठी काही कार्यक्रम आखले गेले. मागासवर्गीय मुलींसाठी मॅट्रीक नंतर शिष्यवृत्ती, मुलींसाठी वसतीगृह, मध्यान्त भोजन, गणवेश, आश्रमशाळा इ. सवलती देण्यात आल्यामूळे काही प्रमाणात शिक्षणाचे प्रमाण वाढायला मदत झाली असली तरीही गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. त्यामूळे उच्च शिक्षणापर्यंत पोहचू शकत नाही. ग्रामीण भागातील मुली फक्त ७ वी पर्यंतच आपले शिक्षण पुर्ण करतात. घरच्या गरीबीमूळे आई–वडीलांना शेतावर काम करावे लागते, त्यामूळे शाळेत उपस्थिती भत्ता, मध्यान्त भोजन, देवूनही मुली शाळेत येत नाहीत. त्यांना आपल्या लहान भावंडांना सांभाळ करावा लागतो शिवाय ग्रामीण भागात मुलगी वायात आल्यानंतर तिचा विवाह करून जबाबदारीतून मुक्त होण्याची पालकांची मानसीकता असल्यामूळे मुलीच्या शिक्षणांचे महत्व पटत नाही आणि जास्त शिकलेल्या मुलीला मुल वरत नाही अशी भिती पालकांच्या मनात असते. त्यामूळे आज स्वतंत्र मिळवून ६८ वर्षे पुर्ण झाली. तरी दलित महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे आणि शिक्षणाच्या अभावामूळेच सामाजिक जीवनातील व कौटूंबिक जीवनातील अनु. जातीच्या स्त्रीयांची असुरक्षीतता संपली नाही आणि त्यामूळेच दलित स्त्रीयांचा सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतीक दर्जा बरोबरीचा नाही.

भारतातील सद्य:स्थितीचा विचार करता २००९–१० च्या लोकसंख्येच्या अहवालानुसार अनु. जातीची लोकसंख्या ८६०.२८ लाख पुरूषांची संख्या असुन स्त्रियांची संख्या ७९२.२२ लाख आहे. महाराष्ट्रात ४४.२८ लाख पुरूषांची व ४१.१० लाख अनु. जातीच्या महिलांची लोकसंख्या आहे. भारतीय स्तरावर ६८.७ टक्के आहेत. यावरून असे निदर्शनास येते की, आज ही स्त्रियांनमध्ये शिक्षणाचे प्रमाण हे कमीच आहे.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी स्त्रीला प्रतिष्ठेची खरी भाषा शिकविली तर स्त्रियांना पुढे नेण्याचे कार्य २० व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीला समान, स्वयंतेज, नवीन दिशा दाखविण्याचे सामाजिक सुधारणेचे महत्वपुर्ण कार्य केले. फुले–आंबेडकरी विचाराने दलित आणि बहुजन सर्ववर्गीय स्त्रियांना त्यांच्या मुक्तीच्या लढयाकरीता नवीन मार्ग आणि आदर्शाची रूजवन केली यातूनच महिलांना खऱ्या प्रगतीचा मार्ग सापडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रियांच्या संदर्भातील भुमीका फार व्यापक अशी होती. केवळ उच्च आणि श्रीमंत स्त्रीवर्गापुरती आपली सुधारणा मर्यादित ठेवणाऱ्या सुधारकांनी या देशातील बहुजन, गिरीजन, दलित, शोषित, शुद्रातिशुद्र स्त्रियांच्या परिवर्तना संदर्भात कोणतीलच हालचाल केंली. नाही या देशातील स्त्रियांना शैक्षणिक प्रगती करण्याचे महत्वाचे कार्य सर्वप्रथम फुले यांनी केलौ तर हिंदू कोड बिलाच्या आधारे स्त्रियांना हक्क प्राप्त व्हावे म्हणून डॉ.आंबेडकर यांनी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला. १९४२ मध्ये नागपूरच्या भूमित अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे अधिवेशन घेयात आले. त्या सभेत ते म्हणातात, की, एखाद्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या सामाजाच्या पग्रतीची मोजमाप करता येते बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील दुबळया स्त्रीलाच प्रथमत: जागृत करण्याचे कार्य केले.

स्त्रीमूक्तीचे पहिले प्रणेते खऱ्या अर्थाने भगवान बुध्द होते. कारण बुध्दपुर्वक काळात स्त्रियांना अनेक किचकट रूढी, प्रथा, परंपरांना तोंड द्यावे लागले त्या काळाात बुध्दींनी स्त्रिला प्रवज्या घेण्याचा हक्क देवून स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने आणून सोडले बुध्दाने वैदिक धर्माचा त्याग करून बुध्द धम्म स्थापन केला व त्या धम्माद्वारे स्त्रियांना न्याय हक्क देण्याचा प्रयत्न केला. वर्ण, जात, अस्पृश्यकता ही भेदाची व्यवस्था मुळातून नष्ट करून व समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. आंबेडकर यांनी दलित स्त्री व पुरूषांच्या उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावले. दलितांमध्ये सर्वात अधिक अन्याय जर कुणावर होत असेल तर तो म्हणजे दलित स्त्रीवर म्हणून स्त्रियांची मुक्ती करण्याचे ध्येय डॉ. आंबेडकरांनी ठरवलेले होते. महाडच्या सत्याग्रह परिषदेत २६ डिसेंबर १९२७ रोजी स्त्रीयांच्या सभेत

डॉ. आंबेडकर सित्रयांना उद्देशून म्हणतात ''स्त्रियांनो, उच्च महत्वाकांक्षा बाळगा ज्ञान व विद्या काही पुरूषांसाठी नाहीत, तर स्त्रियांनाही त्या आवश्यक आहेत. जर तुम्हाला पुढच्या पिढीत परिवर्तन पाहावयाचे असेल तर मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण देण्याची जबाबदारी स्विकारा, साधी राहणी ठेवा'' असे विचार त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. धर्मातरांनंतर व बाबासाहेबांचया महापरिनिर्वाणानंतर दलित स्त्रीत अनेक बदल झाले. दलित स्त्रियांना कर्मकांड, उपासतापास, अंधश्रध्दा, वृतवैकल्ये हे सर्व थोंतांडे वाटू लागले अनेक रूढी, अनिष्ट प्रथा, जिर्ण परंपरेचे जोखड धर्म व बाबासाहेबांच्या विचाराला अनुसरून स्त्रीने झुगारून दिले. डॉ. आंबेडकरानी आयुष्यभर सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला आणि ते या देशातील शोषित पिडित स्त्री–पुरूषांचे प्रेरणास्थान झाले. स्त्रियांच्या मनातील न्युनगंड व गुलामगिरी निपटून काढण्यासाठी स्त्रि चळवळीने बाबासाहेबांच्या पुढील वाक्यातून प्रेरणा घेतली. ''गुलामाला एकदा त्याच्या गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो आपोआप गुलामगिरी विरूध्द संघर्षाला उभा राहिल'' पुरूषप्रधान व्यवस्थेचे मूळे ज्या हिंदू धर्मात आहे तो धर्म नाकारून बाबासाहेबांनी बुध्द धम्माच्या अनुषंगाने स्त्रियांच्या उन्नतीचा, विकासाचा, स्वाभिमानाचा मार्ग मोकळा करून दिला.

आंबेडकरी विचारामूळे स्त्रीच्या मनातील न्युनगंडाची भावना, हिनतेची भावना कमी करण्यास हा विचार उपयुक्त ठरला शिका संघटित व्हा, संघर्ष करा, हे बाबासाहेबांचे ब्रिदवाक्य दीत स्त्रीने प्रेरणास्त्रोत मानले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलित स्त्रियांच्या विकासाचे प्रयत्न केले नाहीत. तर कष्टकरी, शेतमजूर, पिडित इ. स्त्री कल्याणाचा विचार केलेला आढळून येतो. आंबेडकरांचे हिंदू कोड बिल हे देशातील सर्वच हिंदू स्त्रियांच्या उध्दाराचे होते. हे बिल केवळ दलित स्त्रियांसाठीच नाही तर समस्त हिंदू स्त्रियांच्या उध्दाराचे होते. बिल केवळ दलित स्त्रियांसाठीच नाही तर समस्त हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी, उन्नती व विकासाकरीता होते. भारतातील सर्वच स्त्रियांपुढे दारिद्रय, उपासमार, निरक्षरता, हिंसाचार हे प्रश्न असले तरी संख्यात्मक व गुणात्मकरित्या त्यचाचा सर्वाधिक परिणाम दलित स्त्रियांवरच होतो. दलित स्त्रियांच्या विकासाची मांडणी करतांना केवळ आर्थिक विकास इतक्या मर्यादित अर्थाने विचार केला जातो. परंतू दिलत स्त्रियांच्या विकासाबद्दल विचार करतांना आर्थिक विकासाबरोबरच त्यांचा आत्मगौरव त्यांची अस्मिता याचेही भान ठेवण्याची गरज आहे. दलित स्त्रियांनी त्याची सामाजिक सांस्कृतीक ओळख टिकविण्यासाठी माणूसपण नाकारणाऱ्या धर्मग्रंथाची राखरांगोळी करण्याची आवश्यकता आहे.तरच स्त्रियांचा खरा विकास शक्य आहे.

भारतीय इतिहासाचा आढावा घेतला असता जरी वरवर पाहता स्त्रिया गौरव करत असला तरी प्रत्यक्षात प्राचीन काळापासुण महिलांच्या वाटयाला दुय्यम स्थान आहे. १९ व्या शतकात त्यांची स्थिती आणखीच दयनीय

झाली. महिलांचे कार्यक्षेत्र केवळ उंबरठयापर्यंत सिमीत झाले. बदलत्या काळाप्रमाणे महिलांच्या स्थितीत बदल झालेला नाही असे नाही आधुनिक काळात महिलांचे राहणीमान पोषणमान व इतर घटकांप्रमाणे सामाजिक दर्जात वृध्दी झाली आहे. परंतू तरीही त्यांची एकूण स्थिती आजही फार वाईट असलेली दिसून येते. एकीकडे स्त्रियांचा विकास होत नाही. परंतू त्यांच्यावर अत्याचारही होत आहेत.

भारतीय राज्यघटना स्त्री—पुरूषांना समान अधिकार प्रदान करते, परंतू मुलींना मुलांबरोबर शिक्षण देण्याची मानसिकता अजून निर्माण झालेली नाही. राज्यघटनेतील मूल्ये आणि आधुनिक काळातील कायदे यासारख्या अनेक घटकांतून महिलांना अधिकार प्राप्त झाले आहेत. तरी आजही भारतीय स्त्री पाश्चात्य स्त्रीपेक्षा अनेक बाबतीत मागेही आहे आणि वेगळीही आहे. भारतीय राज्यघटनेत कलम १४ ते १५ नुसार स्त्री—पुरूष समानतेचे तत्व मान्य करून महिलांना जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आपली बुध्दिमत्ता व कौशल्य दाखवून आपली योग्यता पटवून दिलेली आहे.

स्त्रियांच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे पुरूष वर्गाची अधिकार गाजविण्याची वृत्ती होय. त्यामूळे स्त्रियांच्या विकासासाठी पुरूषवर्ग मनापासून तयार नव्हता.७३ वी घटना दुरूस्ती ही स्त्री विकासाच्या दृष्टीने महत्वाची पायरी ठरली त्यामूळे ग्रामीण महिलांना समाजात आपले स्थान निर्माण करण्यास संधी प्राप्त झाली.

समाजशास्त्रीय संकल्पनेतून महिलांची स्थिती जाणून घेण्याकरीता महिलांचा समाजातील दर्जा काय? हे महत्वाचे आहे सामाजिक दर्जा व भूमिका या दोन्ही संकल्पना सामाजिक स्थानाशी संबंधीत आहेत प्रत्येक समाजात व्यक्तीचे स्थान हे त्या व्यक्तीला प्राप्त झालेल्या अधिकार आणि कार्यावरून ठरते प्रत्येक सामाजिक स्थानांशी संबंधीत दर्जा आणि भूमिका ठरलेल्या असतात समाजामध्ये व्यक्तीचे जे स्थान असते त्या स्थानानुसार समाज त्या व्क्तीकडून विशिष्ट वर्तनाची अपेक्षा करतो हॅरी जॉन्सनच्या मते दर्जा हा अधिकार किंवा हक्क दर्शवितो तर भूमिका म्हणजे व्यक्तीने करावयाची कर्तव्ये होय थोडक्यात दर्जा व भुमिका या प्रत्येक सामाजिक स्थानाच्या दोन बाजू आहेत.

संविधानातील विविध तरतुदी आणि स्त्रियांचया संदर्भातील कायदे व हक्का संबंधात झालेल्या विविध परिषदा, चर्चासत्र आणि चळवळीमूळे स्त्रियांमध्ये जागृती निर्माण झाली. स्त्रियांना संविधानिक अधिकार तर मिळालेच पण समाजामध्ये पुरूषांकडून स्त्रियांना समानतेची वागणूक मिळाली आहे इतकेच नव्हे तर कौटूंबीक बाबतीत उपेक्षित चूल आणि मुल यापर्यंत सिमित राहिलेल्या स्त्रीला कौंटूंबिक सामाजिक आणि आर्थिक

अधिकार मिळालेले आहे यामूळे महिलांच्या स्थितीत खुप सुधारणा झाली आहे. त्यांना मिळालेल्या अधिकारातून प्रत्येक बाबतीतील आपली भुमिका योग्यपणे बजावत आहे. दलित स्त्रियांना कमी लेखा कामा नये हा विचार हळुहळू भारतीय योग्यपणे बजावत आहे. स्त्रियांना कमी लेखा कामा नये हा विचार हळूहळू भारतीय समाजात रूजू लागला आहे नविन पिढीवर स्वतंत्र समता बंधूता व न्याय या मानवी मुल्यांचा प्रीाव पडला आहे. स्त्रियांना शिक्षण देणे, नौकरी, व्यापार व व्यवसाय करू देणे, स्त्री–पुरूष भेद न पाळणे या गोष्टीना महत्व प्राप्त झाले. त्यामुळे दलित महिलांच्या परंपरागत दर्जा व भूमिकेत परिवर्तन झाले आहे.

ग्रामीण दलित महिलांच्या स्थितीचा विचार करता बौध्द समाजातील महिलांमध्ये जे आमूलाग्र परिवर्तन होवून त्यांच्या कौंटूबिक, सामाजिक व आर्थिक व राजकीय भुमिका व दर्जात वाढ झाली तशी वाढ उर्वरीत दलित महिंलांच्या भूमिका व दर्जात झाली नाही त्यांची स्थिती अजूनही चिंताजनक आहे. महिलांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडून जागृकता आली ती उर्वरीत दलित महिलांमध्ये आणि इतकेच काय तर पुरूषांमध्ये देखील आलेली नाही.

**संदर्भ :**

१. कोंडेंकर, ए.वाय (१९९८); भारतातील आजच्या सामाजिक समस्या : भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन कोल्हापूर.
२. कांडलकर, लिना (२००४) ''मानव विकास'' : विद्या प्रकाषन रूईकर रोड, महाल नागपूर
३. गर्गे स.मा.(२००७) ''भारतीय समाज विज्ञान कोश.खंड ३'': मेहता पब्लीसिंग हाउस पुणे
४. पांगुळ–बारहाते,नंदा (२००९) ''भारतीय ग्रामीण समुदाय विकास'':– आर.बी.प्रकाषन नागपुर.

.....